स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड , मानवविद्याशाखे अंतर्गत अर्थशास्त्र विषयातील पीएच.डी पदवी साठी संशोधन आराखडा.

संशोधन विषय

महाराष्ट्र शासनाच्या समाजकल्याण विभागातर्फे मराठवाड्यातील दिव्यांगांसाठी राबवल्या जाणाऱ्या योजनांचा अभ्यास [२०१४ - २०२४].

संशोधक मार्गदर्शक

डॉ. विश्वनाथ गोविंदराव कंधारे

अर्थशास्त्र विभाग प्रमुख

वै.धुंडा महाराज देगलूकर महाविद्यालय देगलूर.

संशोधक विद्यार्थी

प्रशांत राहुल मुनेश्वर

एम.ए   [अर्थशास्त्र]

संशोधन केंद्र

पीपल्स कॉलेज नांदेड.

सप्टेंबर २०२२

संशोधनाची रूपरेषा

१]प्रस्तावना

२] संशोधन विषयाचं महत्व

३] समस्यासुत्रण

४] संशोधन विषयाचं महत्व

५]] संशोधन विषयाची उद्दिष्टे

६] संशोधनाची गृहीतके

७] संशोधनाची पद्धती

८] संशोधनाचा कालखंड

९] संशोधनाची व्याप्ती

१०] संशोधनाची मर्यादा

११] संशोधनाची नियोजित प्रकरणे

१२] संदर्भ

महाराष्ट्र शासनाच्या समाजकल्याण विभागातर्फे मराठवाड्यातील दिव्यांगांसाठी राबवल्या जाणाऱ्या योजनांचा अभ्यास [२०१४ - २०२४].

प्रस्तावना

भारताने संसदीय शाशन पद्धतीचा स्वीकार केला आहे. भारतातील प्रत्येक व्यक्तीला संधीची समानता कायद्याच्या स्वरूपात संविधानाच्या माध्यमातून बहाल केली. सत्तेचे विकेंद्रीकरनाच्या माध्यमातून बाळकटी करण करण्यासाठी त्यांचं विभागवार वर्गीकरण करण्यात आले आहे . सामान्य जनतेमधून लोकप्रतिनिधी निवडून शासनाच्या निर्णय प्रक्रिये मध्ये बसवण्याचं काम सामान्य जणतेणे केले त्यांचा उद्देश समाजाचे कल्याण हा होता .

भारत हा लोकशाही प्रधान देश आहे . भारतात शाश्वत विकासाला खुप वाव आहे . शाश्वत विकास म्हणजे भारतातील प्रत्येक व्यक्तीचा विकास होय. याला दिव्यांग कसे अपवाद असतील , दिव्यांग म्हणजे विभिन्न क्षमता असलेल्या लोकांचा समूह होय. या दूरलक्षित समूहाच्या विकासा साठी राष्ट्रीय तसेच आंतर राष्ट्रीय स्तरावर प्रयत्न केल्याचं दिसून येते. दिव्यांगांच्या सर्व समावेशक विकासाला गती मिळाली. या नंतर २००६ला आंतर राष्ट्रीय स्तरावर दिव्यांगच्या हक्काचा आंतर राष्ट्रीय करार संमत करण्यात आला. मानवी हक्का मध्ये दिव्यांगांना विशेष प्राध्यान्य देण्यात आलं .

सन १९९३ मध्ये भारतात दिव्यांग अधिकार गटाची स्थापना केली गेली , याचीच पोहोच पावती म्हणून आपल्या देशात सामान संधी संरक्षण हक्क आणि पूर्ण सहभाग कायदा १९९५ पास झाला. कायदा पास झाल्या मुले भिन्न क्षमता असलेल्या लोकांच्या विकासाला दिशा मिळाली.

२०११ च्या महाराष्ट्रा च्या लोकसंख्येनुसार दिव्यांगांची लोकसंख्या १५६९६८२ इतकी आहे. अस्थिव्यंग लोकांचं प्रमाण ३६ % आहे . कर्ण बधिरांचे प्रमाण ३७ % अंध लोकांचं प्रमाण ६% आहे. महाराष्ट्रातील दिव्यांगांच्या आर्थिक विकासा साठी तसेच आर्थिक सक्षमीकारणा साठी महाराष्ट शासनाने विविध कायदे केलेत त्या मध्ये अपंगत्व कायदा

१९९५, महाराष्ट्रा दिव्यांग व्यक्ती अधिनियम कायदा २००१ . राष्ट्रीय न्याय अधिनियम १९९९, व २००६. महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त विकास महामंडळ २००२ इत्यादी.

देशातील प्रत्येक दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध व्हावे, समाजातील दुर्बल, दुर्लक्षित अपंगांना समाजाच्या मूळ प्रवाहात आणावे तसेच, त्यांच्या अपंगत्वाकडे न पाहता त्यांच्यामध्ये असलेल्या सामर्थ्यांकडे पाहून त्यांच्या मधील असलेले गुणसामर्थ्य विकसित करुन त्यांना समाज जीवनाच्या सर्व अंगामध्ये समान संधी, संपूर्ण सहभाग व त्यांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे यांसारख्या अनके दिव्यांगहिताच्या तरतुदी या कायद्यात आहेत. या कायद्यामध्ये दिव्यांगांचा मानसन्मान राखून त्या कायद्याचा लाभ घेऊन दिव्यांगांचा सर्वांगीण विकास करता येईल याची काळजी घेण्यात आली आहे. या नवीन (RPWD Act, 2016) कायद्याच्या अंमलबजावणीमुळे १९९५ चा कायदा पूर्णपणे निरसित (रद्द) करण्यात आला.

संशोधन विषयच महत्व

दिव्यांग हा समाजातील वांचत समुहा पैकी घटक आहे. काळानुरूप दिव्यांगांची संख्या वाढताना दिसून येते आहे . पण दिव्यांगांची सामाजिक, आर्थिक , शैक्षणिक , राजकीय स्थिती आवश्यक त्या प्रमाणात सुधारलेली दिसून येत नाही. दिव्यांगांची सामाजिक, आर्थिक , शैक्षणिक , राजकीय प्रगती व्हावी व त्यांना समाजात मानाचे स्थान मिळावे यासाठी महाराष्ट्र शासनाच्या समाजकल्याण विभागाच्या वतीने पुढील योजना राबवल्या जातात.

१] १] शासकीय संस्थांमधून दिव्यांगांचे शिक्षण आणि प्रशिक्षण.

२] स्वयंसेवी संस्थे मार्फत चालवण्यात येणाऱ्या विशेष शाळा / कार्यशाळां मधून दिव्यांगांचे शिक्षण व प्रशिक्षण.

३] गटइ स्टॉल योजना .

४] दिव्यांग कल्याण पुरस्कार

५] दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम अवयव व साधने पुरविणे.

६] दिव्यांग व्यक्तींना पुनर्वसनासाठी वित्तीय सहाय्य.

७] दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी बीज भांडवल.

८] दिव्यांग विद्यार्थ्यांना गुणवत्ता पारितोषिके.

९] मतिमंद बालगृहे.

१०] दिव्यांग -अव्यंग व्यक्तीच्या विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक सहाय्याची योजना.

समस्यासूत्रंन

दिव्यांगांना आर्थिक व सामाजिक सुरक्षा मिळावी म्हणून महाराष्ट्र शासन तर्फे विविध कायणकारी योजना राबवल्या जातात. राष्ट्रीय स्तरावरून ते गाव पाळली प्रयन्त विविध शासकीय संस्थांच्या माध्यमातून कार्यान्वित केल्या जातात. वाढत्या लोकसंख्ये बरोबरच दिव्यांगांचं पण प्रमाण वाढताना दसून येते. .

संबंधित संशोधनात राज्य सरकार तर्फे दिव्यांगांसाठी कोण कोणता योजना राबवल्या जातात ? त्यांचा दिव्यांगांना किती प्रमाणात लाभ मिळतो? दिव्यांगांची योजना विषयांची जागरूकता किती प्रमाणात आहे, आशा आसंख्ये समस्यांचा अभ्यास करण्या साठी' महाराष्ट्र शासनाच्या समाजकल्याण विभागातर्फे मराठवाड्यातील दिव्यांगांसाठी राबवल्या जाणाऱ्या योजनांचा अभ्यास [२०१४ - २०२४]. हा विषय निवडला आहे.

संशोधन विषयाची निवड

भारत स्वतंत्र झाल्या पासूनच देशाच्या सर्वांगीण विकासा साठी विविध योजना व कार्यक्रमाची सुरवात केली गेली. दिव्यांगांना समाजात मानाचं स्थान मिळावं त्यांना आर्थिक व सामाजिक सुरक्षा मिळावी यासाठी विशेष काळजी घेतली गेली.

राज्य सरकार तर्फे दिव्यांगांच्या आर्थिक विकासासाठी कोण कोणत्या योजना राबवल्या जातात किती लोकांना त्या योजनांचा लाभ मिळतो , काळानुरूप योजनांमध्ये काय सुधारणा करण्याची गरज आहे का ? हे अभ्यासण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या समाजकल्याण विभागातर्फे मराठवाड्यातील दिव्यांगांसाठी राबवल्या जाणाऱ्या योजनांचा अभ्यास [२०१४ - २०२४]. हा विषय निवडला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे

१] समाजकल्याण विभागामार्फत दिव्यांगांसाठी राबवण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांचा अभ्यास करणे.

२] दिव्यांगांच्या स्वयंरोजगार निर्मितीमधील कल्याणकारी योजनाची भूमिका अभ्यासणे .

३] दिव्यांग व्यकतीमधील लिंगनिहाय योजनांचा अभ्यास करणे.

४] कल्याणकारी योजनांचा दिव्यांगांच्या जीवनावर होणाऱ्या आर्थिक प्रभावाचा अभ्यास करणे.
संशोधनाची गृहीतके

१] कल्याणकारी योजनांमुळे दिव्यांगांची सामाजिक स्थिती सुधारली आहे.

२] कल्याणकारी योजनांमुळे दिव्यांगांची आर्थिक स्थिती सुधारली आहे.

३] दिव्यांग व्यक्तींमध्ये उद्‌योजकीय क्षमता विकसित करण्यात कल्याणकारी योजनांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावलीआहे.

४] कल्याणकारी योजनांद्‌वारे दिव्यांगांसाठी रोजगाराच्या संधींमध्ये वाढ होत आहे.

संशोधंन साहित्याचा आढावा

१] जोन्स आणि बेली- यांनी त्यांच्या अभ्यासात निदर्शनास आणून दिले की, कोणताही शारीरिक दोष एखाद्या व्यक्तीच्या मनोवैज्ञानिकस्थिती मध्ये अडथळा आणू शकतो. याचे कारण असे की अशा व्यक्ती सामान्यतः शारीरिकदृष्ट्या सुदृढ आणि तंदुरुस्त असलेल्या लोकांच्या तुलनेत तणावपूर्ण परिस्थितीचा सामना करण्यास कमी सक्षम असतात.

२]लीन - यांनी त्यांच्या अभ्यासात शारीरिक अपंगत्व आणि मानसिक विकाराचा धोका यांच्यातील संबंध लक्षात घेतला. त्यांच्या अभ्यासाच्या परिणामातून असे दिसून आले आहे की अपंग व्यक्ती त्यांच्या चिंताग्रस्त नैराश्याचा आणि मुख्य विकारांना कायमस्वरूपी ठामपणे अनुभवतात.

३] रिचर्ड्   - त्याच्या अभ्यासात नमूद करतात की दिव्यांग तरुणांसाठी अनेक पुनर्वसन कार्यक्रम यशस्वी होत नाहीत कारण असे कार्यक्रम केवळ कौशल्यावर आधारित प्रशिक्षणावर भर देतात .

४] Ersin Uskun & Duru Gundogar अभ्यासानुसार, आर्थिक समस्या पालकांसाठी मानसिक समस्या निर्माण करते. यांनी शिफारस केली आहे की पालकांना आर्थिक बाबी साठी सहकाय करावे .

५] सिंग-, यांनी दिव्यांग मुले असलेल्या कुटुंबातील तणावाचे निरीक्षण आणि अभ्यास केला . त्याच बरोबर कुटुंबातील आर्थिक उदासीनता , कुटुंबाची दिनचर्या , शारीरिक तसेच मानसिक आरोग्यावर होणारे दुष्परिणाम यांचा अभ्यास केला. सर्व सामान्य माणसांचा त्याच्या कुटुंबा प्रती असलेल्या दृष्टीकोणाचा अभ्यास केला.

संशोधनाची पद्धती

संबधीत संशोधन करण्यासाठी विश्लेणात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग केला जाणार आहे २०११ च्या महाराष्ट्र च्या लोकसंख्येनुसार दिव्यांगांची लोकसंख्या २९५९३९२ इतकी आहे. अस्थीव्यंग लोकांच प्रमाण ३६%, कर्ण बधिरांचं प्रमाण ३७% आणि अंध लोकांचं प्रमाण ६% आहे. २०१६ च्या कायद्या नुसार दिव्यांगांचे २१ प्रकार पाडण्यात आले आहेत. पण वर नमूद केलेल्या तीन प्रकारातील लोकांचं प्रमाण जास्त आहे.

नमुना निवड

या संशोधन मध्ये माहितीच्या प्राथमिक आणि दुय्यम स्त्रोताचा वापर करून माहिती संकलित केली जाणार आहे .

प्राथमिक स्त्रोता मध्ये दिव्यांगांच्या मुलाखती घेऊन प्रश्नावली उपयोग करून माहिती संकलित केली जाणार आहे. लाभार्थी दिव्यांगांच्या शेकडा प्रमाणावरून १० % दिव्यांगांची नमुना म्हणून निवड केली जाईल. दुय्यम स्रोता मार्फत उपलब्ध आकडेवारीचे विश्लेषण करण्याकरिता [सरासरी , शेकडा बदल, वृद्धीदर] या संख्या शास्त्रीय पद्धतीचा वापर केला जाईल.

संशोधाचा कालखंड

महाराष्ट्र शासनाच्या समाजकल्याण विभागातर्फे मराठवाड्यातील दिव्यांगांसाठी राबवल्या जाणाऱ्या योजनांचा अभ्यास करण्या साठी [२०१४ - २०२४]. हा कालखंड निवडला आहे.

संशोधनाची व्याप्ती

प्रस्तुत संशोधन हे मराठवाडा विभाग पुरते मर्यादित आहे .

संशोधनाची मर्यादा

प्रस्तुत संशोधन मराठवाडा विभागा पुरते मर्यादित आहे तसेच दिव्यांग या वंचित सामाजिक समुहा पुरते मर्यादित आहे.

संशोधनाची नियोजित प्रकरणे

प्रकरण पहिली : प्रस्तावना .

प्रकरण दुसरे : संशोधन साहित्याचे पुनरावलोकन.

प्रकरण तिसरे : मराठवाड्याची आर्थिक व भोगोलिक स्थिती.

प्रकरण चोथे : मराठवाड्यातील दिव्यांगांचं सामाजिक - आर्थिक विशलेषण .

प्रकरण पाचवे : दिव्यांगांसाठी राबवण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांचा अभ्यास.

प्रकरण सहावे : निष्कर्ष आणि शिफारशी .

संदर्भ -

१] १] अन्नदाते शशिकांत २०१९ संशोधन पद्धती के सागर पब्लिकेशन पुणे.

२] अपंग अधिनियम कायदा १९९५. भारत सरकार .

३] अपंग अधिनियम कायदा २०१६ . भारत सरकार

४] . यादव दत्ता सोपानराव २०१४ . नांदेड जिल्ह्यातील विविध क्षमता असलेल्या व्यक्तीच्या उत्थानासाठी राष्टीय अपंग वित्तात विकास महामंडळाची भूमिका .

५] सुर्यवंशी भांडाजी रंगराव २०१९ मराठवाड्यातील दिव्यांगांच्या आर्थिक विकासात महाराष्ट्र राज्य अपंग वित्तात विकास महामंडळाचे योगदान .

६] www,wikipidia.com

७]https://socialjustice .gov.in

८]https://sjsa.maharashtra.gov.in

संशोधक

प्रशांत राहुल मुनेश्वर

संशोधन मार्गदर्शक

डॉ .व्ही. जी . कंधारे सर .